# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : रविवार १५ एप्रिल २०१८
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| १. श्री मंगेश मनोहर राणे | १०. श्री गुरुनाथ गणपत राणे (आमंत्रित) |
| २. श्री सुनिल सदानंद राणे | ११. श्री लवू शिवाजी राणे (आमंत्रित) |
| ३. श्री उदय भगवान राणे | |
| ४. श्री दशरथ दत्ताराम साटम | |
| ५. श्री पांडूरंग सावजी राणे | |
| ६. श्री अशोक दत्ताराम राणे | |
| ७. श्री भरत गणपत राणे | |
| ८. श्री हेमंतकुमार रमेश राणे | |
| ९. श्री उत्तम वामन राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथील निवासस्थानी घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील ९ सदस्य तसेच आमंत्रितांपैकी २ ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी प्रथम उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना सचिवांनी विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

**<u>विषय क्रमांक १ अंर्तगत</u>** सचिवांनी श्री उत्तम वामन राणे यांस दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ रोजी घेण्यात आलेल्या कार्यकारीणी सभेचे इतिवृत्त उपस्थितांना वाचून दाखविण्याची विनंती केली. श्री उत्तम वामन राणे यांनी इतिवृत्ताचे वाचन केल्यानंतर उपस्थिताकडून इतिवृत्तामध्ये कोणत्याही सुचना / सुधारणा / बदल सुचविण्यात न आल्यामुळे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**<u>विषय क्रमांक २ अंर्तगत</u>** सचिवांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांस मागील कार्यकारीणी सभेनंतर हाती घेतलेल्या कामांच्या प्रगतीसंबधी माहीती देण्याची विनंती केली. यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी उपस्थितांस खालील माहीती दिली –

- **<u>पथदिवे</u>** - इतिवृत्तामध्ये नमुद केल्यानुसार चार पथदिव्यांची जोडणी ग्रामपंचायतीकडून मिळणाऱ्या सार्वजनिक विद्युतव्यवस्थेवर करावयाची असून त्यासाठी लागणाऱ्या वायरची मोजनी करण्यात आलेली होती परंतू त्यानंतर पुढे काहीही प्रगती झालेली नाही. शक्यतो या किंवा पुढील महीण्यात जेव्हा मुंबईस्थित ग्रामस्थ गावी असतील त्यावेळी याबाबत पुढचे काम चालू करता येईल.

- **<u>सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्था</u>** – याबाबत श्री प्रविण मधुकर राणे यांनी सुचविलेले कंत्राटदार श्री अवधूत हळदणकर यांची भेट घेऊन त्यांस प्रत्यक्ष बांधकाम करावयाच्या जागेची माहीती आणि बांधकामाचा आराखडा देऊनही पुढे काहीच हालचाल झालेली नसल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांस त्यांच्या घराचे बांधकाम करणारा कंत्राटदार हे काम करू शकेल का ? अशी विचारणा मार्च महीण्यात केली होती. त्यानुसार श्री मंगेश मनोहर राणे यांनी ताबडतोब श्री सौरभ राणे (94229 98529 / 94236 84409) यांस ज्यावेळी माझे श्री लिंगेश्वर मंदिराच्या जिर्णोध्दारसंबधी गावी घेण्यात येणाऱ्या सभेसाठी जाणे होणार होते त्यावेळी माझी भेट घेण्याची सूचना केली. त्यानुसार श्री सौरभ राणे यांनी दिनांक १८ मार्च २०१८ रोजी मी गावी भेट घेतली असता त्यांस टाकीच्या बांधकामाचे आराखडे व प्रत्यक्ष जागेची माहीती दिली. श्री सौरभ राणे यांना जागा दाखवितेवेळी जागामालक श्री शंकर बाळकृष्ण राणे हे देखील उपस्थित होते, त्यांनी जागेमध्ये थोडा बदल (पूर्वी नियोजिलेल्या जागेच्या थोड्या खालील बाजूस) सूचविला. श्री सौरभ राणे यांनी पाण्याच्या टाकीचे बांधकाम करावयास २० फूट बाय २० फूट जागेची साफसफाई करून घ्यावयास लागेल अशी सूचना केली. कार्यकारीणीचे स्थानिक सदस्य सौ अनुजा अरुण राणे व श्री संकेत रत्नाकर राणे यांचेवर श्री सौरभ राणे यांनी सूचविलेल्या जागेची साफसफाई करून घेण्याची जबाबदारी सोपविली आहे (स्थानिक ग्रामस्थांनी सचिवांस कळविले आहे की त्यांनी ठरविलेल्या जागेची साफसफाई करून घेतली आहे). श्री सौरभ राणे यांनी बांधकाम करावयाच्या जागेजवळ बांधकाम साहित्य पोहचविण्यासाठी जेसीबी लावून थोडा रस्ता बनवावा लागेल तसेच त्या रस्त्याच्या वाटेवर येणाऱ्या एका विद्युत खांबाच्या ओढणीची तार सरकवावी लागेल असे सांगितले. श्री सौरभ राणे यांस तुम्हीच जेसीबी आणून हे काम करून घ्या अशी विनंती केली. श्री सौरभ राणे यांनी सांगितले की ते १५ एप्रिल २०१८ पर्यंत रामनवमी उत्सव व हाती असलेल्या दुसऱ्या कामात बिझी असल्यामुळे ते एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये कदाचीत कामाची सुरवात करू शकतील. श्री सौरभ राणे यांस आपण बांधकाम साहित्य पुरविण्याचे ठरविले असून ते मजूरदार आणून हे काम करून घेणार आहेत. आपण या कामाबाबत अगोदर अंदाजपत्र (रुपये १.५० लाख ते रु.१.८० लाख) केलेले असून त्याच अंदाजपत्रानुसार खर्च होईल अशी अपेक्षा आहे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व स्त्रोत्रामधील रक्कम ग्रहीत धरता हे काम पूर्ण व्हावयास काही अडचण येऊ नये. जर काम ठरविलेल्या वेळेनुसार सुरू झाले तर मे महीण्यापूर्वी टाकीचे बांधकाम पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे आणि टाकीचे बांधकाम काम सुरू झाल्यावर पाणीपुरवठ्यासाठी पाईपलाइन टाकावयाचे काम हाती घेता येईल.

- **<u>वाडीवर येणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती तसेच टेंबावर जाणाऱ्या नवीन नोंदणी झालेल्या रस्त्याचे खडीकरण / डांबरीकरण</u>** – यासंदर्भात दिनांक १८ मार्च २०१८ रोजी श्री लिंगेश्वर देवळाच्या जिर्णोध्दार संबधी गावी घेण्यात आलेल्या सभेनंतर पिसेकामते गावचे सरपंच श्री सुहास राणे यांची भेट घेऊन त्यांनी मार्च २०१८ पर्यत काम करून देण्याचे आश्वासन दिले होते त्याचे काय झाले याबाबत विचारणा केली. श्री सुहास राणे यांनी सांगितले की त्यांनी आमदारसाहेबांशी पत्रव्यवहार केलेला असून ही कामे मे २०१८ पर्यंत मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. पिसेकामते ग्रामपंचायतीस रस्ते बांधणी / दुरुस्तीसाठी रु.५ लाख निधी मंजूर झाला आहे असे कळल्याचे मी विचारल्यावर त्यांनी माहीती दिली कि तो निधी दुसऱ्या रस्त्यासाठी मंजूर झाला आहे. चर्चेदरम्याण त्यांनी सांगितले की फळसेवाडी ग्रामस्थ त्यांच्या मागण्या घेऊन ग्रामपंचायतीत येत नाहीत तसेच फळसेवाडी ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांनी एकत्रितपणे आमदारांकडे पाठपूरावा केल्यास कामे लवकर होतील. यावर मी श्री सुहास राणे यांस सांगितले की गावी असलेले बहूतांशी ग्रामस्थ वयस्कर असल्यामुळे त्यांस ग्रामसभेस किंवा इतर वेळी उपस्थित राहणे शक्य होत नाही. या मुख्य कारणामुळेच फळसेवाडी हितकारी संस्थेच्या माध्यमातून आम्ही मुंबईहुन आमदारांशी पत्रव्यवहार / पाठपुरावा करत असतो आणि

त्यानुसार ग्रामस्थांच्या मागणीचे एक निवेदन त्यांस गेल्यावर्षी जुलै २०१७ मध्ये दिलेले आहे तसेच आमदार साहेबांनी केलेल्या सूचने नुसार त्या पत्राची एक प्रत त्यांच्या कणकवलीस्थित स्थानिक कार्यालयातही दिलेली आहे. श्री सुहास राणे यांस कल्पना दिली या आमच्या मागण्या गेल्या कित्येक वर्षांपासून असून आजपर्यंत त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही तरी आपण सरपंच या नात्याने याबाबत पुढाकार घेऊन ही कामे लवकर मार्गी लावावीत. श्री सुहास राणे यांस दिनांक २६ मार्च २०१८ रोजी आमदार साहेबांस दिलेल्या निवेदनाची प्रत पाठविली असून पुढील प्रत्यक्ष भेटीत याबाबतची विचारणा करता येईल.

- तसेच रस्त्याच्या बांधकामासाठी पेव्हर ब्लॉक वापरण्यासंबधी श्री प्रविण मनोहर राणे यांनी मागिल सभेत केलेल्या सूचनेनंतर त्यांचेकडून पुढे काही माहिती मिळू न शकल्यामुळे आणि श्री प्रविण मधुकर राणे आजच्याही सभेस उपस्थित नसल्यामुळे पुढील सभेपूर्वी त्यांच्याकडून याबाबतीत माहीती मिळवून हा विषय पुन्हा चर्चेस घेण्यात येईल.

**विषय क्रमांक ३ अंर्तगत** सभासद नोंदणी मोहिमेचा आढावा घेतांना सचिवांनी उपस्थितांस खालील माहीती दिली –
*कंसातील आकडे मागिल कार्यकारीणीसभेपर्यंत झालेल्या प्रगतीसंबधी आहेत.*

- ३१ मार्च २०१८ पर्यंत एकूण ९५ (६६) ग्रामस्थांशी संर्पक करण्यात आला असून त्यापैकी ९३ (६४) ग्रामस्थांनी सभासदत्वाचे फार्म भरून दिले आहेत.
- तसेच सभासद होऊ इच्छिनाऱ्या ग्रामस्थांपैकी ५७ (४०) ग्रामस्थ वार्षिक वर्गणी भरू इच्छिनारे असून उर्वरीत ३८ (२४) ग्रामस्थांनी वार्षिक वर्गणी भरण्याबाबत सवलत मागितली आहे.
- तसेच ३१ मार्च २०१८ पर्यंत संस्थेकडे थकबाकीपैकी रु.२३,१००/- (रु.१८,०२०/-) इतकी रक्कम जमा झाली असून, नविन सभासदांची प्रवेश फी रु.६,८००/- (रु.४,३००/-) तसेच वार्षिक साल २०१७-१८ साठीच्या वार्षिक वर्गणीपैकी रु.३४,१५०/- (रु.२४,०००/-) रक्कम जमा झालेली आहे.

| | **पुरुष** | **स्त्री** | **मृत सभासदांचे कुटूंबिय** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ग्रामस्थांशी संर्पक करण्यात आला | ५७ | ३८ | ४ | ९९ |
| सभासदांकडून फार्म भरून मिळाले | ५५ | ३८ | - - | ९३ |
| वार्षिक फी भरू इच्छीणारे सभासद | ४६ | ११ | - - | ५७ |

| | **सभासद संख्या** | **रक्कम जमा** |
|---|---|---|
| सभासदांकडून थकबाकी जमा | ३१ | २३,१०० |
| नविन सभासदांकडून नोंदणी फी जमा | ६८ | ६,८०० |
| वार्षिक फी भरू इच्छीणाऱ्या सभासदांकडून २०१७ – १८ सालाची वार्षिक फी जमा | ५७ | ३४,१५० |
| सभासदांकडून देणगी प्राप्त | १ | ५,००० |
| **आर्थिक वर्ष २०१७ – १८ साली जमा** | | **६९,०५०** |

सचिवांनी उपस्थितांस सांगितले की जमा झालेली रक्कम वेळोवेळी संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली असून ३१ मार्च २०१८ रोजी संस्थेच्या बँक खात्यामध्ये जवळजवळ रु.१.२२ लाख रुपये इतकी रक्कम जमा आहे.

सचिवांनी पुढे सांगितले की आपण कार्यकारीणी सदस्यांना सभासद नोंदणी मोहीमेअंर्तगत कार्यक्षेत्राची विभागवार वाटणी करतांना त्यांना दिलेली कार्यक्षेत्रे त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणाजवळ असतील अशी काळजी घेऊनदेखील काही सदस्य या कामाबद्दल उदासीनता दाखवत आहेत तसेच काही कार्यकारीणी सदस्य कार्यकारीणीच्या सभांना हजर राहण्याची जबाबदारी पार पाडत नाहीत हे योग्य नाही. फळसेवाडीतील ग्रामस्थांनी कार्यकारीणी सदस्य निवडून त्यांचेवर टाकलेली जबाबदारी पार पाडणे हे कार्यकारीणी सदस्यांचे कर्तव्य असून कार्यकारीणी सदस्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामस्थांचे काय गरजा / अडीअडचणी आहेत ते कार्यकारणी सभेच्या माध्यमातून व्यासपीठावर मांडणे गरजेचे आहे जणेकरून कार्यकारीणी ग्रामस्थांच्या अडीअडचणींवर सर्वसामावेषक साधकबाधक चर्चा घडवून त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू शकेल.

त्यानंतर सचिवांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांस विभागवार प्रगतीची माहीती उपस्थितांस देण्याची विनंती केली असता श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगितले की मुख्यतो खालील विभागांत नीटसे काम झालेले नाही.

(१) भाईंदर, नायगाव, नालासोपारा, वसई, विरार व पालघर [उर्वरीत जवळपास ११ कुटुंबे]
(२) परेल, ताडदेव, वरळी, डिलाईल रोड व काळाचौकी [उर्वरीत जवळपास १० कुटुंबे]
(३) गोरेगाव आणि जोगेश्वरी [उर्वरीत जवळपास ५ कुटुंबे]
(४) घाटकोपर, कांजूरमार्ग, पवई व कुर्ला [उर्वरीत जवळपास ५ कुटुंबे] आणि
(५) भांडूप व मुलूंड [उर्वरीत जवळपास ४ कुटुंबे]

यावर चर्चा करण्यात आली असता गोरेगाव व जोगेश्वरी विभागासाठी नियुक्त करण्यात आलेले कार्यकारीणी सदस्य श्री जयवंत नाना राणे हे त्यांच्या प्रकृती अस्वास्थामुळे धावपळ करू शकणार नाहीत याची नोंद घेण्यात येऊन या विभागातील कामाची जबाबदारी श्री गुरुनाथ गणपत राणे, श्री शंकर बाळकृष्ण राणे व श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी संयुक्तरीत्या लवकरात लवकर पार पाडावी असा निर्णय घेण्यात आला.

तसेच इतर विभागासाठी नेमलेल्या कार्यकारीणी सदस्यांस वैयक्तिक स्मरणपत्रे पाठवून त्यांना या कामाबाबत निरुत्साह का आहे किंवा त्यांना काही अडचणी आहेत का ? हे जाणून घेऊन त्यांच्या अडचणींचे निरकारण करून जून २०१८ पूर्वी दिलेले काम पूर्ण करावयाची त्यांस सूचना करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

सचिवांनी पुढे सांगितले कि कार्यकारीणी सदस्यांनी उर्वरीत या कामाबद्दल उदासिन असल्यामुळे सभासद नोंदणीस मिळत असलेला प्रतिसाद उत्साहवर्धक नाही. आपण स्वबळावर प्रायोजित कामे पूर्ण करावयाचा प्रयत्न करत असल्यामुळे कार्यकारीणी सदस्यांनी लवकरात लवकर सभासद नोंदणी अभियान पूर्णत्वास नेण्यास सहाय्य करावे.

**<u>विषय क्रमांक ४ अंर्तगत</u>** सचिवांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांस श्री लिंगेश्वर देवळाच्या जिर्णोध्दार संबधी झालेल्या प्रगतीची माहिती देण्याची विनंती केली असता श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगितले की दिनांक १८ मार्च २०१८ रोजी गुढीपाडव्याच्या निमित्ताने गावी सभा घेण्यात आली होती, सभेमध्ये निवदा दस्ताऐवज मंजूर करण्यात आलेला असून निवदा दस्ताऐवजाचे वाटप करण्यात आले. निविदा दस्ताऐवज जवळपास ८ कंत्राटदारांनी नेलेला असून निविदा दस्ताऐवज भरून देण्याची शेवटची तारीख १५ एप्रिल २०१८ ही आहे. त्यानंतर दिनांक २२ एप्रिल २०१८ च्या दरम्याण

पिसेकामते विकास मंडळ व देवस्थान समिती यांची संयुक्त बैठक होणार असून त्यामध्ये आलेल्या निवदांची छाननी केली जाईल त्यानंतरच्या आठवड्यात कंत्राटदारांनी केलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येऊन ३० मे २०१८ च्या आसपास कंत्राटदारासोबत करारपत्र होण्याचा संभव आहे व या कार्यक्रमानुसार काम पार पडल्यास मे महिण्यात देवळाचे काम सुरु होण्याची शक्यता आहे.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की पिसेकामते विकास मंडळाने आपल्या संस्थेकडे ३० पावतीपुस्तके दिलेली आहेत. प्रत्येक पावती पुस्तकात २५ पावत्या असून सभासदांने / ग्रामस्थाने प्रत्येक पावती मागे कमीतकमी रु.१००/- अशी देणगी मिळवून पुस्तकामागे कमीतकमी रु.२,५००/- इतकी देणगी जमा करून देवळाच्या जिर्णोध्दाराच्या कार्याला आर्थिक हातभार लावावा अशी अपेक्षा पिसेकामते विकास मंडळाने व्यक्त केली आहे. आपण अद्याप या पावतीपुस्तकांचे वितरण ग्रामस्थांमध्ये केलेले नसल्यामुळे याबाबत काही निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच आपणांस ही बाब शक्य नसल्यास आपणास तसे पिसेकामते विकास मंडळास कळविणे जरूरीचे आहे कारण लवकरच देवळाच्या बांधकामास सुरवात होण्याची शक्यता आहे आणि देवालयाच्या कामासाठी निधी पूर्णतह: उभारला जाणे गरचेचे आहे. यानंतर उपस्थितांमध्ये चर्चा होऊन एकूण १० पुस्तकांचे वितरण करण्यात आले. वितरण झालेल्या पुस्तकांची माहीती खालीलप्रमाणे आहे.

| **क्र** | **नाव** | **पुस्तक क्र** | **पावती क्र** | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री उदय भगवान राणे | १६१ | ४००१ | ४०२५ |
| २ | श्री अशोक दत्ताराम राणे | १७१ | ४२५१ | ४२७५ |
| ३ | श्री मंगेश मनोहर राणे | १७२ | ४२७६ | ४३०० |
| ४ | श्री हेमंतकुमार रमेश राणे | १७४ | ४३२६ | ४३५० |
| ५ | श्री सुनिल सदानंद राणे | १७५ | ४३५१ | ४३७५ |
| ६ | श्री उत्तम वामन राणे | १७६ | ४३७६ | ४४०० |
| ७ | श्री भरत गणपत राणे | १७७ | ४४०१ | ४४२५ |
| ८ | श्री गुरुनाथ गणपत राणे | १७८ | ४४२६ | ४४५० |
| ९ | श्री गुरुनाथ गणपत राणे | १७९ | ४४५१ | ४४७५ |
| १० | श्री भास्कर दौलत राणे | १८० | ४४७६ | ४५०० |

कार्यकारीणी सदस्यांस त्यांना वितरीत करण्यात आलेल्या पुस्तकांमार्फत शक्य तेवढया लवकर आणि जास्तीत जास्त देणगी मिळवून परत करण्याची सूचना करण्यात आली.

श्री अशोक दत्ताराम राणे यांनी विचारणा केली की त्यांच्या काही कुटुंबियांस देवालयाच्या कामासाठी काही देणगी द्यावयाची असल्यास त्यांनी काय करावे ? यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहिती दिली की सध्या पिसेकामते विकास मंडळाकडे नोंद असलेल्या सभासदांकडून रु.५,०००/-  इतकी देणगी मिळविण्याचा प्रयत्न चालू असून या व्यतिरिक्त स्थानिक ग्रामस्थांनी गावी असलेल्या प्रत्येक बिऱ्हाडामागे रु.२,०००/- इतकी देणगीची रक्कम बसविली असून त्यामार्फत निधी उभारणी चालू आहे. ज्या सभासदांच्या कुटुंबियांस देणगी द्यावयाची इच्छा असेल ते सभासद न होताही आता वितरीत केलेल्या पावती पुस्तकांमार्फत देणगी देऊ शकतात आणि रु.५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या ग्रामस्थाचे / देणगीदाराचे नाव देणगीदारांच्या नामफलकावर लिहिण्यात येईल.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे माहिती दिली कि पिसेकामते विकास मंडळ उर्वरीत निधी उभारणीसाठी देवळाचे खांब आणि पायऱ्या यांसाठी पुरस्कर्ते शोधणार असून सर्वप्रथम ग्रामस्थास हे खांब / पायऱ्या पुरस्कृत करण्याची संधी देण्यात येईल. खांब किंवा पायऱ्या पुरस्कृत करणाऱ्याचे नाव त्या खांबावर / पायरीवर कोरण्यात येईल जेणेकरून देवालयाच्या जिर्णोध्दाराचे काम स्थानिकांच्याच हातभाराने (दुसऱ्या कुणापुढे हात न पसरता) पूर्ण केल्याचा आदर्श पुढील काही दशके सर्व ग्रामस्थाच्या समोर राहील.

**<u>विषय क्रमांक ५ अंर्तगत</u>** सचिवांनी सांगितले की विषय क्रमांक २ अंर्तगत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सार्वजनिक पाणीपुरवठ्यासंबधी होत असलेल्या प्रगतीची माहीती दिली आहे. त्यापुढे सार्वजनिक विहीर बांधणीसाठी फंडाची उभारणीसंबधी त्यांचे काय विचार आहेत ते उपस्थितांस सांगावेत.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगितले त्यांच्या कुटूंबापैकी श्री आनंद नारायण साटम हे ब्राम्हणाच्या विहीरीजवळील काही जमीनींच्या मोजणीच्या प्रयत्नात असता त्यांस त्यांच्या जमीनीजवळील काही गट क्रमांक पिसेकामते ग्रामपंचायतीच्या नावावर असल्याचे निर्दशनास आले. त्यांनी दिलेल्या माहीतीनुसार एकूण तीन गट क्रमांक मुख्यतो गट क्रमांक ५६१ (काजऱ्याचा नाळवा), गट क्रमांक ६५६ (तीन आंबे) आणि गट क्रमांक ११५२ (नाळवा) हे पिसेकामते ग्रामपंचायतीच्या नावावर आहेत. जर कदाचित यापैकी कोणत्याही गट क्रमांकात ब्राम्हणाची विहीर येत असल्याचे आढळल्यास आपणांस बक्षिसपत्र पुन्हा करावयाची गरज भासणार नाही. याबाबत सरपंच श्री सुहास राणे यांस दिनांक २६ मार्च २०१८ रोजी पत्र पाठवून या गट क्रमांकाची माहीती त्यांस देऊन ग्रामपंचायतीमार्फत या गट क्रमांकाची सरकारी मोजणी करण्याची विनंती केली आहे. तसेच कार्यकारीणी सदस्य श्री संकेत रत्नाकर राणे व ग्रामस्थ श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांस सरपंचांस पाठविलेल्या पत्राच्या प्रती पाठवून याबाबत पाठपूरावा करण्याची विनंती केलेली आहे.

तसेच हल्लीच मिळालेल्या माहितीनुसार पैलाडहून मिळणाऱ्या पाण्याबाबत सध्या सतत वाद होत असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थ ब्राम्हणाच्या विहीरीत पाण्याचा पंप लावावयास विरोध करणार नाहीत अशी अपेक्षा आहे. त्यामुळे जर पाण्याच्या टाकीचे बांधकाम मे महीण्याच्या अखेरी पर्यंत संपावयाचा अंदाज आल्यास पाईप लाईन टाकून ब्राम्हणाच्या विहीरीचे पाणी पावसाळ्याच्या दरम्याण ग्रामस्थास वापरता येऊ शकेल.

वरील बाब पूर्ण झाल्यास अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यासाठी पुढील वर्षीच्या जानेवारी महीण्यात आपण डोहाच्या चिंचेजवळ नवीन विहीर बांधावयाचे काम हातात घेऊ. ग्रामस्थांना संस्थेच्या कार्याची / तळमळीची जाणीव झाल्यास कदाचीत फंड उभारणीस अडथळा येणार नाही. तसेच सभासद नोंदणी पूर्ण झाल्यावर आपण सर्व सभासदांच्या नावे ग्रामपचायतीत व आमदारांकडे अर्ज देऊन फंड मिळविता येतो का तेही पाहता येईल. श्री दशरथ साटम यांनी पुढे माहिती दिली काही ग्रामस्थांनी स्वत:हून त्यांच्याशी संर्पक करून या विधायक कामांसाठी लागणाऱ्या आर्थिक खर्चाचा भार उचलण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे कदाचित फंड उभारणीस कष्ट लागणार नाहीत.

**<u>विषय क्रमांक ६ अंर्तगत</u>** सचिवांनी उपस्थितांना माहीती दिली की गेल्या कार्यकारीणीच्या सभेनंतर कोणत्याही सभासदाकडून अथवा ग्रामस्थाकडून संस्थेकडे पत्रव्यवहार झालेला नाही.

**<u>विषय क्रमांक ७ अंर्तगत</u>** उपस्थित सभासदांकडून / आमंत्रिता कडून कोणत्याही नवीन योजना मांडण्यात आल्या नाहीत.

**विषय क्रमांक ८ अंर्तगत** इतर विषयांवर चर्चा करण्यात आली असता

- श्री भरत गणपत राणे यांनी विचार मांडला केला की संस्था आकारत असलेली रु.६००/- ही वार्षिक वर्गणी म्हणजेच महीना रु.५०/- फक्त ही वर्गणी अगदीच शुल्लक आहे असताना संस्था ही वर्गणी भरण्यास का सवलत देत आहे. जरी संस्थेकडून अशी सवलत मिळत असली तरी प्रत्येक ग्रामस्थाने या सवलतीचा लाभ न घेता स्वतःहून प्रत्येक कुटुंबसदस्यांमागे रु.६००/- वर्गणी भरावयाचा विचार केला पाहीजे. प्रत्येक ग्रामस्थांस खात्री पटली पाहीजे की जमा करण्यात येणारे सर्व पैसे ग्रामस्थांच्या सुखसोयीसाठी खर्च होणार आहेत तरच आपली संस्था पुढे जाऊ शकेल.

  श्री भरत गणपत राणे यांनी खंत मांडली की आपल्या पिढीने गावात काहीच सुधारणा केलेल्या नाहीत उलट आपल्या वाडवडीलांनी राखून ठेवलेली सर्व संप्पती नष्ट करण्याचे काम केले आहे. आपल्या वाडवडीलांनी ही संप्पती त्यांच्या पिढीतच नष्ट केली असती तर आपण काय केले असते आणि आपण पुढच्या पिढीसाठी काय ठेवत आहे याचा विचार व्हावयास हवा. श्री भरत गणपत राणे यांनी पुढे सांगितले की पूर्वी वाडीमध्ये भरपूर आंबा, फणस व शेगुलाची झाडे होती, परंतू काही ग्रामस्थांनी त्यांची मुलेबाळे या झाडांचा उपभोग घेणार नाहीत असा विचार करून ती तोडून विकल्यामुळे आता वाडीवर एकही आंब्याचे झाड दिसत नाही त्यामुळे लहान मुलांना गावी आणल्यावर मनोरंजनासाठी काय करावयाचे हा विचार येतो. माडाच्या पाण्यावर किंवा मदारबाबा कडे जाणारे रस्ते बंद झाल्यामुळे करवंदासाठी फिरावयास मिळत नाही. ग्रामस्थांना एकत्रित करून याबाबत त्यांस जाणिव करून द्यावयास हवी. कदाचित पुढील काळी सामान्य माणसांस मुंबई राहणे आर्थिक दृष्ट्या कठीण झाल्यास गावी राहण्याचा मार्ग उपलब्ध ठेवावयास हवा.

- श्री लवू शिवाजी राणे यांनी उपस्थितांस सांगितले की संस्था गेली कित्येक वर्षे खासदार / आमदार / ग्रामपंचायत यांचे मार्फत ग्रामस्थांच्या समस्या सरकार दरबारी मांडत असूनसुध्दा या समस्यांचे निराकारण होत नसल्यामुळे आपण याबाबत पुर्नविचार करावयास हवा. आपणांस कदाचीत याबाबत ठोस निर्णय घेऊन पुढील वाटचाल आखावी लागेल.

  श्री लवू शिवाजी राणे यांनी उपस्थित केलेल्या विषयाबाबत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगितले की आपण सभासद नोंदणी पूर्ण झाल्यावर आपल्या संख्याबळाच्या आधारे पुन्हा सरकार दरबारी स्थानिक नेत्यांच्या मार्फत प्रयत्न करू आणि त्यात यश न लाभल्यास दुसरा विचार करावयाचा का ? याबाबत चर्चा करून ठोस निर्णय घेऊ. सध्यातरी संस्थेसोबत किती ग्रामस्थ आहेत याचा पूर्ण अंदाज आलेला नसताना आपण ठोस निर्णय घेऊ शकतो का ? आपली सध्याची संघटणात्मक ताकद किती ? याचा विचार व्हावयास हवा.

  श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की संस्था एप्रिल २०१७ मध्येच पुर्नजिवित करण्यात आलेली असतांना गेल्या वर्षभरात कार्यकारीणीतर्फे करण्यात आलेली कामगिरी स्पूर्तीदायक नसली तरी दिलासादायक नक्कीच आहे. ग्रामस्थांचा अजुनही कार्यकारीणीवर पूर्ण विश्वास नाही याची आपणांस जाणीव आहे, आपण प्रथमतः ग्रामस्थांचा विश्वास संपादन करावयास हवा. ग्रामस्थांना कार्यकारीणी करत असलेली कामे ही त्यांच्याच भल्यासाठी आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठीच आहे याची जाणीव व्हावयास हवी. त्यानंतर सर्व ग्रामस्थांची एकजूट झाल्यावर आपण थोडा जोर लावल्यास गेली ३० ते ४० वर्षे अडलेली हि कामे नक्कीच पुढील दोन वर्षात पूर्णत्वास नेऊ शकू.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे विचार मांडला की सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्थित झाल्यावर तसेच वाहनरस्ते सुस्थितीत आल्यावर सार्वजनिक शेती / भाजीपाला / फुलझाडे यासारख्या बाबीचाही विचार करण्यात येईल व यासाठी सर्व ग्रामस्थांच्या विचारांची प्रथमता देवाणघेवाण व्हावयास हवी व प्रत्येक ग्रामस्थास दुसऱ्याबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावयास हवे.

यानंतर अध्यक्षांनी सार्वजनिक शेती करण्याचे त्यांचेही स्वप्न असल्याचे उपस्थितांस सांगितले. लवकरात लवकर आपण या मार्गाने जाऊन गावातील तरुण पिढीस कायमचा रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू

त्यानंतर सचिवांनी उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
सचिव

श्री मंगेश मनोहर राणे
अध्यक्ष